# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>प्रसिद्धी पत्रक                                   ता. २३ नोव्हेंबर २०१९</u>

# ‘वॉक अ‍ॅण्ड टॉक विथ मेयर’ २४ नोव्हेंबरपासून

## महापौर संदीप जोशी यांचा उपक्रम : नागरिकांसोबत करणार चर्चा

**नागपूर, ता. १८ :** महापौरपदी विराजमान झाल्यानंतर पहिल्याच दिवशी महापौर संदीप जोशी यांनी काही अभिनव उपक्रमांची घोषणा केली. याअंतर्गत रविवार २४ नोव्हेंबरपासून ‘वॉक अ‍ॅण्ड टॉक विथ मेयर’ हा उपक्रम सुरू होत आहे.

शहरातील विविध उद्यानांमध्ये दररोज विविध क्षेत्रातील प्रतिष्ठीत मंडळी, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक व शहराच्या विकासाला दिशा देणारे व्यक्ती फिरायला जातात. या सर्व व्यक्तींशी संवाद साधून त्यांच्या सूचना घेण्याकरीता ‘वॉक अँड टॉक विथ मेयर’ ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. ‘वॉक अँड टॉक विथ मेयर’अंतर्गत रविवार २४ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबरदरम्यान दररोज ७.३० वाजता विविध उद्यानांमध्ये महापौर संदीप

जोशी भेट देउन नागरिकांशी चर्चा करतील व त्यांच्या सूचना मागवितील. उपक्रमाच्या पहिल्याच दिवशी रविवारी (ता. २४) महापौर संदीप जोशी हे मेजर सुरेंद्रदेव पार्क धंतोली उद्यानात जातील आणि नागरिकांशी संवाद साधतील. २५ नोव्हेंबर रोजी जपानी गार्डन, सेमिनरी हिल्स, २६ नोव्हेंबर रोजी चाचा नेहरू बालभवन उद्यान, सुभाष रोड, २७ नोव्हेंबर रोजी दयानंद पार्क, जरिपटका, २८ नोव्हेंबर रोजी अंबाझरी उद्यान, २९ नोव्हेंबर रोजी भारत माता व डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान गरोबा मैदान आणि ३० नोव्हेंबर रोजी सक्करदरा येथील दत्तात्रय नगर उद्यान येथे जातील.